महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२
व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत सुधारणा.
सुधारीत नियमावली

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: क्रीडाधो- संकीर्ण/प्र.क्र. ४९ /क्रीयुसे-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ८ जानेवारी, २०१९.

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/११/ क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३९/ क्रीयुसे-३, दि.२२ जानेवारी, २०१४.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-३११४/प्र.क्र.१६५/ क्रीयुसे-१, दि.१६ ऑगस्ट, २०१४.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. क्रीडायो ३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३, दिनांक ३ ऑक्टोबर,२०१६
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन पुरकपत्र क्र. क्रीडायो ३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३, दिनांक १६ जानेवारी,२०१८

प्रस्तावना -

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्रमांक-४.७ (ब) हा व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत सुधारणा करण्याबाबत आहे. त्यानुसार व्यायामशाळा बांधकाम व व्यायाम साहित्य देण्याच्या जिल्हास्तरीय योजनेची अनुदान मर्यादा वाढवून निकषात सुधारणा करून दिनांक २२ जानेवारी,२०१४ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. संदर्भ क्र. ३, ४ व ५ अन्वये यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबीचा अंतर्भाव करून या योजनेसाठी सुधारीत नियमावलीसह सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

या शासन निर्णयाद्वारे व्यायामशाळा बांधकाम व व्यायाम साहित्य देण्याच्या जिल्हास्तरीय योजनेची सुधारित नियमावली लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या योजनेचा दिनांक २२.०१.२०१४, दिनांक १६.०८.२०१६, दिनांक ३.१०.२०१६ व दिनांक १६.०१.२०१८ चा शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक व शासन पुरकपत्र अधिक्रमित करण्यात येत आहेत.

३. या योजनेचा लाभ देण्यासाठी शासन निर्णयासोबतची परिशिष्ट "अ" मधील नियमावली लागू राहील. सुधारित अनुदान मर्यादा व नियमावली शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थींनी करावयाचा विहीत नमुन्यातील अर्ज आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, यांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळ तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा.

४. या जिल्हास्तरीय योजनेकरिता संबधित जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सद्य:स्थितीत व्यायामशाळा विकास या जिल्हास्तरीय योजनेचे जे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. तेच या योजनेसाठी पुढे सुरु राहील.

६. या योजनेत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तपासून तांत्रिक मान्यता प्रदान करावी व पात्र संस्थांची निवड, निकष प्राथम्य क्रमाने ज्येष्ठतेनुसार संस्थांची यादी तयार करण्यात यावी त्यानुसार पात्र संस्थांना अंतिम प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

७. सदर शासन निर्णयानुसार, सुचविलेल्या सुधारणा या प्रशासकीय विभागाच्या मार्गदर्शक सूचना स्वरुपात असल्याने, त्यामुळे कोणतेही अतिरिक्त आर्थिक दायित्व निर्माण होणार नाही.

८. सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४७/१४८१, दिनांक २९/९/२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०८११०५२४५७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.01.08 11:10:01 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महासांचालक, माहिती व जनसंपर्क,संचालनालय यांना या शासन निर्णयाची व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनांतीसह.
५. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
८. नियोजन विभाग (का.१४७१ व १४८१), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी यांना संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत.
१२. सर्व उपसांचालक,क्रीडा व युवक सेवा (क्रीडा व युवक सेवा,संचालनालयामार्फत).
१३. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा व युवक सेवा,संचालनालयामार्फत).
१४. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन,मुंबई.
१५. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१६. मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).

**शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो- संकीर्ण/प्र.क्र. ४९ /क्रीयुसे-१, दि. ८/१/२०१९ चे सहपत्र**

**परिशिष्ट - अ**

**व्यायामशाळा विकास अनुदान योजना बाबतची नियमावली**

**नियम क्र.१** **या नियमावलीस व्यायामशाळा बांधकाम व आधुनिक व्यायाम साहित्य यासाठी अनुदान मंजूर करणे असे संबोधण्यात येईल.**

सदर नियमावली नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम क्र.२** **अनुदानासाठी पात्र संस्था :-**

अनुदानासाठी पात्र संस्थासाठी प्राथम्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था ( ग्रामपंचायत, नगरपरिषद,नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद,कॅन्टोनमेंट बोर्ड), शासकीय रूग्णालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण विभाग यांनी मान्यता दिलेल्या शाळा व महाविद्यालये तसेच जिल्हा परिषद, आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग मार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा,आश्रमशाळा व वसतिगृह, शासकीय उप जिल्हा रूग्णालय, शासकीय जिल्हा रूग्णालय,शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणीक शाळा व महाविद्यालयांना शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होवून ५ वर्ष पुर्ण झालेले आहेत असे शाळा व महाविद्यालये अनुदानासाठी पात्र राहतील.
३. क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी/पोलीस विभाग , शासकीय कार्यालये/जिमखाना हे अनुदानासाठी पात्र राहतील.

**नियम क्र.३** **अनुदानाच्या बाबी :-**

१. किमान ५०० चौ.फूट चटई क्षेत्राचे स्वतंत्र व्यायामगृह बांधकाम करणे, याशिवाय बांधकामामध्ये कार्यालय/भांडारगृह, प्रसाधनगृह इ.बाबींचा समावेश असावा.
२. व्यायामशाळा नुतनीकरण व दुरुस्ती करणे.
३. जुन्या नियमानुसार बांधकाम पुर्ण झालेल्या व्यायामशाळा व वर उल्लेखीत क्षेत्रफळाच्या नवीन व्यायामशाळांना अत्याधुनिक व्यायाम साहित्याचा पुरवठा करणे.
४. खुली व्यायामशाळा उभारणे (Open Gym)

**नियम क्र.४** **अनुदान मंजूरीच्या अटी व शर्ती :-**

१. नियम क्र.३ मध्ये नमूद केलेल्या बाबीसाठी स्वत:च्या मालकीची किंवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक) व्यायामशाळा बांधकामासाठी जागा असणे आवश्यक आहे.
२. ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, शासनाच्या विविध विभागामार्फत दाखल करण्यात येणा-या प्रस्तावासोबत अंदाजपत्रक, आराखडे, जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे व इतर हमीपत्रे इ.सादर करणे आवश्यक राहील तसेच वर उल्लेखीत सर्व यंत्रणा १०० टक्के अनुदानास पात्र राहतील.

३. बांधकामास ग्रामपंचायत, नगदपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच संबंधित बाबींचे खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडे नोंदणीकृत अभियंता/नोंदणीकृत वास्तुशिल्पतज्ञ (आर्किटेक्ट) यांनी मान्य केलेले असावे.

४. व्यायामशाळेचा वापर इतर कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही. तसेच व्यायामशाळेचा उपयोग कोणत्याही राजकीय कार्यक्रमाकरिता करण्यात येऊ नये.

५. व्यायामशाळेचा भविष्यातील देखभालीवर सर्व खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

६. शासकीय कार्यक्रमाकरिता सदरची व्यायामशाळा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी लागेल.

७. व्यायामशाळा बांधकामासाठी मंजुर अनुदानाव्यतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडयानुसार जास्तीचा करावा लागणारा बांधकामावरील खर्च संस्थेने करून प्रकल्प पुर्ण करावा तसेच विनियोग प्रमाणपत्र व प्रकल्प पुर्णत्वाचा दाखला जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे बंधकारक राहिल.

८. अनुदान मंजुरीसाठी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित मुदतीत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील. अर्ज सादर केल्यानंतर प्रथमत: जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रस्तावाची छाननी करुन संबंधित जागेला भेट देऊन खात्री केल्यानंतर परिपुर्ण प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात यावी. अंदाजपत्रकीय रक्कम किंवा अनुदान मर्यादा रक्कम रू.७.०० लक्ष यापैकी जी रक्कम कमी असेल इतकीरक्कम एक रकमी अनुदान म्हणून मंजूर करावी. तसेच मंजूर अुनदाना व्यतिरिक्त जास्तीचा खर्च (अंदापत्रकानुसार) संबधित संस्थेने करून प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.जिल्हा क्रीडा अधिकारी वा त्यांचे प्रतिनिधी यांनी सदर संस्थेच्या बांधकामाच्या प्रगतीची वेळोवेळी शहनिशा करावी.

९. सदर योजनेतंर्गत देण्यात येणारे अनुदान हे एकाच हप्त्यामध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येईल.

१०. व्यायाम साहित्यासाठी प्रस्ताव दाखल करताना प्रस्तावाबरोबर आवश्यक त्या व्यायाम साहित्याची यादी व व्यायामसाहित्य खरेदी करावयासाठी अधिकृत पुरवठारदाराचे खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक राहील. प्रस्तावाला प्रथम तत्वत: मान्यता देण्यात येवून शासन अनुदान रू.७.०० लक्ष मर्यादेत अनुदान रक्कम संस्थेस वितरीत करण्यात येईल. अनुदान मंजूर संस्थेने खरेदीबाबतचे सर्व शासकीय नियमाची अंमलबजावणी करून प्रस्तावासोबत जोडलेल्या व्यायाम साहित्य यादी नुसार व्यायाम साहित्य खरेदी करावे.

११. लाभार्थी संस्थेच्या व्यायामशाळेत प्रत्यक्ष व्यायाम साहित्य उभारणी झाल्यानंतर त्यांची छायाचित्रे (लाभार्थी संस्थेव्दारे सांक्षाकिंत ) व साहित्य प्राप्तीचे प्रमाणपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांचेकडे जमा करणे बंधनकारक राहील.

१२. व्यायाम साहित्य खरेदीसाठी संस्था अनुदानित वर्षापासून दर पाच वर्षानंतर अनुदानास पात्र राहील. मात्र व्यायामशाळा बांधकामासाठी संस्थेला एकदाच लाभ घेता येईल.

१३. संबंधित अर्जदार संस्थेस प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे ही संस्थेशी संबंधित व खरी असल्याबाबत तसेच प्रकल्प पूर्ण करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- कोर्ट फी स्टॅम्पवर सादर केरणे आवश्यक राहील

१४. मंजुर अनुदानाच्या मुदतीत खर्च न झाल्यास अथवा मंजूर अनूदानाचा दुरूपयोग झाल्याबाबत शासनाच्या / कार्यालयाच्या निर्दशनास आल्यास सदरचे मंजूर अनुदान मंजूरीच्या तारखेपासून दंडनीय व्याजासह आर.आर.सी. अंतर्गत वसूल करण्यात येईल.

१५. प्रस्तावासोबत चुकीची अथवा खोटी माहिती अथवा कागदपत्रे सादर केल्यास प्रस्ताव सादर करणाऱ्या यंत्रणेवर नियमानुसार कार्यवाही करून जबाबदारी निश्चीत करण्यात येईल.

१६. संस्थेने दिलेली माहिती तालुका क्रिडा अधिकारी, क्रिडा अधिकारी यांचे मार्फत प्रत्यक्ष भेट देऊन त्याचा तपासणी अहवाल त्यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी यांना सादर करावा.

१७. मंजूर अनुदानाचा विनियोग अंदाजपत्रक आराखडयानुसार अनुदान प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत करून मंजूर अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र, लेखाविवरणपत्र, प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला, बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे छायाचित्रे सक्षम यंत्रणेच्या स्वाक्षरीच्या दाखल्यासह व्दिप्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहील.

१८ जिल्हा परिषद बांधकाम विभाग,खाजगी कंत्राटदार इत्यादी माध्यमांबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व्यायामशाळा बांधकामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१९. खुल्या व्यायामशाळेच्या उभारणीकरीता संस्थेच्या मालकीची किमान १००० चौ.फुट मोकळी जागा, सार्वजनिक मोकळी जागा, उद्याने, विविध क्रीडांगणे या ठिकाणी प्राधान्याने अनुदान देण्यात येईल. ज्या संस्थेकडे १००० चौ.फुट चटई क्षेत्रास तारेचे कुंपण (चॅनलिक फेन्सिंग) सह मोकळी जागा असल्यास खुल्या व्यायाम शाळेच्या व्यायाम साहीत्यासाठी प्राधान्याने अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

२०. खुली व्यायामशाळा उभारणेकरीता व्यायामाचे साहीत्य जोडणी (फीटींग) जमिनीमध्ये फाउंडेशनसह करणे आवश्यक आहे. सदर सिव्हिल कामाचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात यावा.

**<u>नियम क्र.५</u>  दुरूस्ती व नुतनीकरणाच्या अटी** -

१. बांधकाम किमान १५ वर्षे जुने असावे तसेच दुरूस्तीपूर्वी सतत वापर असावा.

२. दुरूस्ती व नुतीकरणाची खात्री जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

३. व्यायामशाळेचे नुतनीकरण अथवा दुरूस्ती बांधकाम नियमानुसार नसल्यास अनुदान देय ठरणार नाही.

**<u>नियम क्र.६</u>  अनुदानाचा दर व मर्यादा -**

(अ) नियम क्र. २ मध्ये नमूद केलेल्या सर्व संस्थांना बांधकामाच्या बाबीकरिता अंदाजपत्रकीय खर्चाची प्रत्यक्ष रक्कम अथवा जास्तीत जास्त रु.७.०० लक्ष यापैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन एक रक्कमी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

**(आ)** विशेष घटक योजनेसाठी शासनाने घोषित केलेल्या दलित वस्तीच्या गावातील आणि आदर्श गावातील तसेच शासनाने घोषित केलेल्या आदिवासी भागातील नियम क्र.०२ मधे नमुद केलेल्या पात्र संस्थांना अंदाजीत खर्चाच्या १०० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ७.०० लाख यापैकी कमी असेल इतकी रक्कम एक रक्कमी अनुदान म्हणून मंजूर करावी.

**(ई)** नियम क. २ मध्ये अनुदानासाठी पात्र असणाऱ्या संस्था कार्यालये यांना १०० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त रु. ७.०० लक्ष मंजूर करण्यात येईल. यासाठी स्वहिस्सा भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

**<u>नियम क्र.७</u>  अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत-**

अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रांसह संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

(अ) नोंदणी प्रमाणपत्र व घटनेची सत्यप्रत - शासनाव्दारे मान्यता दिलेल्या शैक्षणीक शाळा व महाविद्यालये यांच्या करिता.

(ब) जागेच्या मालकी हक्क पुराव्यासाठी ७/१२ चा उतारा.

<u>किंवा</u>

३० वर्षे दीर्घ मुदतीच्या करारावर असलेल्या जागेबाबत पुरावा दर्शविणारे नोंदणीकृत कागदपत्र.

<u>किंवा</u>

नोंदणीकृत बक्षीसपत्र. दानपत्र.

(क) शासकीय अनुदान घेण्याविषयी व्यायामशाळेच्या बांधकामावर अनुदाना व्यतिरिक्त होणारा खर्च करण्याचा संस्थेच्या कार्यकारिणीच्या ठरावाची सत्यप्रत व हमीपत्र.

(ड) नियम क्रमांक ४ मधील नमूद केलेल्या व्यायामशाळेच्या बांधकामास ग्रामपंचायत,नगरपरिषद, महानगरपालिका, यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागातील उपअभियंता किंवा नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषदेतील सक्षम अभियंता यांनी मान्य केलेले असावे.

(इ) बांधकामासाठी अनुदान मंजूर झाल्यापासून एक वर्षात व्यायामशाळा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (सक्षम अभियंत्याने प्रमाणित केलेला) संचालनालयात सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा मंजूर अनुदान १८% दंडनीय व्याजासह वसूल करण्यात येईल.

**<u>नियम क्र.८</u> अनुदान मंजुरीचे तसेच आहरण व संवितरण अधिकार -**

उपरोक्त नियमांच्या अधिन राहून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>नियम क्र.९</u> नियमात बदल/शिथिल करण्याचे अधिकार-**

सदर नियमात अंशतः/पूर्णत: बदल किंवा नियम शिथील करण्याचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागास राहतील.

– – –– – – – –